# भिवंडी निजामपूर शहर महानगरपलिका,भिवंडी.

<u>प्रस्तावना:-</u>

**विषय:- भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ०५ निजामपूर क्षेत्रात पाण्याची नविन पाईप लाईन टाकणेबाबत.**

**संदर्भ :- शासन शुध्दीपत्रक क्रमांक:-२०२२/प्र.क्र.२३६ (११४)/नवि-१६ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.दिनांक ११ जुलै २०२३.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ०५ निजामपूर क्षेत्रात पाण्याची नविन पाईप लाईन टाकणेबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये "**महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास**" या योजनेअंतर्गत अ.क्र.३ येथी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका शाळा क्र.७,८,११,२७ च २९ निजामपूर येथील शांळांच दुरुस्ती करणे रक्कम रुपये २००.०० लक्ष या कामांस कार्यारंभ आदेश दिला नसल्यास सदर काम रद्द करून त्याऐवजी खालील नमूद कामास शुध्दीपत्रान्वये शासनाकडून मंजूरी देण्यांत आलेली आहे.

विषयांकित कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,२४,९९,९६७/- इतकेचे प्रस्ताव तयार करून मा.प्रशासक तथा आयुक्त सो यांचे मंजूरी करीता सादर करण्यांत आले असता, सदर प्रस्तावास कार्यकारी अभियंता,मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्य शिफारसी प्रमाणे मा.प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी दिनांक ०४/०८/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये प्रशासकीय मान्यते करीता मा.जिल्हाधिकारी सो, ठाणे यांचेकडे प्रस्ताव पाठविणेकामी प्रशासकीय ठराव मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्र.:-** 283 **दिनांक :-** ९/८/२०२३

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ०५ निजामपूर क्षेत्रात पाण्याची नविन पाईप लाईन टाकणेबाबत कामी शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- २०२२/प्र.क्र.२३६ (११४)/नवि-१६ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ११ जुलै २०२३ अन्वये रु. १.२५ कोटी निधीची मंजूरी प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त नमुद कामाचे प्रस्तावास कार्यकारी अभियंता,मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्य शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,कडील शासन आदेश क्रमांक एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४,दिनांक ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार मी अजय वैद्य, प्रशासकीय तथा आयुक्त,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरील नमुद कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,२४,९९,९६७/- च्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारी,ठाणे यांचेकडे प्रशासकीय मान्यता करीता पाठविणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**